पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक :नस/४/कावि/१०३/२०२१
दिनांक : २६/०२/२०२१

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा दि.**०५/०३/२०२१** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा **शुक्रवार** दिनांक **०५/०३/२०२१** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.विधी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ०८**

**दिनांक : ०५/०३/२०२१** **वेळ : दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा **शुक्रवार,** दिनांक **०५/०३/२०२१** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक **२२/०२/२०२१** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ०७)** चा सभावृत्तांत कायम करणे.

-----------

विषय क्र.१) मे.ईगल इंन्फ्रा इंडिया लि. यास कामाचे आदेश निर्गत (निविदा दर ५.८६% कमी) करणेत आलेले आहे. सदर कामासाठी मे. शशि प्रभु असो. यांची सल्लागार म्हणून नेमणुक करणेत आलेली आहे. सद्यास्थितीत सदर ठिकाणचे काम चालु आहे.पिंपरी प्रभाग क्र. ४३ जिजामाता रुग्णालयासाठी नवीन इमारत बांधणे हे काम यापुर्वी निविदा शेडुल मधील सर्व बाबींचे निविदा रक्कम या मर्यादेत पुर्ण झाले असुन सदर इमारत वैद्यकिय विभागाकडे हंस्तांतरीत करणेत आली आहे. तसेच सदर कामाचे अंतीम बील तयार करणेत आले असुन अदायगीसाठी लेखा विभागाकडे सादर केलेले आहे. कोरोना कोवीड– १९ मुळे प्रतिबंधक उपाय म्हणुन रुग्णालयात १०० बेडची व्यवस्थापनाचे काम मा. आयुक्त साहेब व मा. वैद्यकिय अधिकारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे काम सुरु केले आहे. सदरच्या सुचने मध्ये जिजामाता रुग्णालय येथील डॉक्टर (वैद्यकिय अधिकारी) निवासस्थानासाठी विद्युत व्यावस्था करणेचे व रुग्णालयाकरीता एक्सप्रेस फिडर द्वारे अखंडीत वीजपुरवठा करणेकामी मराविवि कंपनी व विद्युत विभागाचे सहशहर अभियंता विद्युत/ यांत्रिकी यांचे समवेत याबाबत चर्चा होऊन रिंग मेन युनिट बसवुन केबल चार्ज करुन एक्सप्रेस फिडर द्वारे वीज पुरवठा करणे बाबत सुचना व आदेश देण्यात आले व त्या कामावर झालेला खर्च रक्कम रु ८२,५५,०००/-थेरगाव येथील चालु असलेल्या रुग्णालयाच्या कामातअतिरिक्त बाब (Extra Item)म्हणुन समावेश करुनमे. ईगल इंन्फ्रा इंडिया लि. यांना अदा करणेत यावा असा प्रस्ताव मा. आयुक्त सो. यांनी दि. १३/५/२०२० च्या प्रस्तावानुसार मंजुर केला आहे व त्या खर्चास जागेत बदल होत असल्याने मा.विधि समितीची मान्यता घेणेची आवश्यकता आहे. त्यास अनुसरुन संबधीत ठेकेदारांने काम सुरु केले

आहे. वर नमुद केल्या प्रमाणे मुळ चालु असलेल्या कामाच्या जागेत बदल होत असल्याने यांस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**( दिनांक ०५/०३/२०२१ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

-------------

(उल्हास बबनराव जगताप)

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय

क्रमांक : नस/४/कावि/१०३/२०२१

दिनांक : २६/०२/२०२१ चे लगत.